मुख्य कार्यकारी अधिकारी
सोलापूर जिल्हा नागरी सह. बँक्स
को ऑप. असोसिएशन लि., सोलापूर



# नवीन एकरकमी कर्ज परतफेड योजना

विद्याधर अनास्कर
दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि.
अध्यक्ष

आपल्या आर्थिक अडचणींमुळे अनेक कर्जदारांची कर्ज खाती थकित झाल्याने जसे बँकांचे नुकसान होते तसेच कर्जदारांचे बाजारातील पतही कमी झाल्याने त्यांच्या इतर आर्थिक व्यवहारावरही परिणाम झाल्याशिवाय रहात नाही. असे कर्जखाते ज्यावेळी एनपीए होते, त्यावेळी त्या कर्जदारावर बसलेला एनपीएचा शिक्का हा त्याला आर्थिक क्षेत्रातील गुन्हेगार ठरवतो व असा आर्थिक गुन्हेगारीचा शिक्का त्यास व्यवसायातही घातक ठरतो. एकंदरीत त्याची विश्वासार्हताच पणाला लागल्याने त्याला समाजातील कोणत्याच घटकापासून सहकार्य मिळत नाही. या वैफल्यग्रस्त अवस्थेतून सुटका करुन घेण्याची सुवर्णसंधी महाराष्ट्र शासनाने नागरी सहकारी बँकांमधील थकबाकीदारांना 'नवीन एकरकमी कर्ज परतफेड योजने'द्वारे दिली आहे.




सन २००१ पासून दरवर्षी नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी नित्याची बाब बनलेल्या बहुचर्चित ओटीएस ची योजना ही नित्याची बाब न बनता, अपवादात्मक असावी या मानसिकतेतून राज्य सरकारने प्रथमच दि. ३१ मार्च, २०१४ पूर्वी अनुत्पादक झालेल्या कर्जखात्यांना या नवीन योजनेत शेवटची संधी देत यापुढे भविष्यात केवळ नवीन थकित कर्जदारांसाठीच ही योजना चालू ठेवण्याचे स्पष्ट संकेत दिल्याने वर्षानुवर्ष या योजनेवर अवलंबून राहणाऱ्या जुन्या थकित कर्जदारांवर त्यांची खाती बंद करण्याचा दबाव निश्चितच वाढणार आहे.

कोणतीही माफी योजना (Amnesty Scheme) ही नित्याची बाब बनू नये, त्यामुळे कर्जदारांमध्ये पैसे न भरण्याची वृत्ती वाढीस लागण्याबरोबरच प्रामाणिक कर्जदारांवर अन्याय होतो, हे लक्षात घेऊन राज्य शासनाने दि. १६ मार्च, २०१६ रोजी जाहीर केलेली ही नवीन योजना जास्तीत जास्त पारदर्शी ठेवण्याचा व सर्व कर्जदारांना ती कोणताही भेदभाव न करता समानपणे लागू करण्याचा प्रयत्न केला असून, ग्राहकांच्या मनामध्ये कोणतीही शंका राहू नये अथवा बँकांना या योजनेत कोणताही बदल स्वत:च्या पातळीवर करता येऊ नये, याची दक्षता घेतल्याचे जाणवते. सबब आपल्यावरील आर्थिक गुन्हेगारीचा शिक्का पुसण्याची सुवर्णसंधी म्हणूनच या योजनेकडे थकित कर्जदारांनी पाहिले पाहिजे. या योजनेतील ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे-

१) या नवीन योजनेतील 'कट ऑफ डेट' ही दि. ३१/०३/२०१५ केल्याने सहकारी बँकांमधील अलिकडच्या काळात थकित झालेल्या कर्जदारांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेची मुदत दि. ३१/०३/२०१७ पर्यंत राहणार असून, त्यासाठी अर्ज करावयाची शेवटची तारीख २८/०२/२०१७ ही राहणार आहे.

२) रिझर्व्ह बँकेने कमर्शिअल बँकांना लागू केलेल्या

योजनेत न्यायालयांमध्ये निकाली निघालेली व ज्यांचे शासनाच्या या नवीन योजनेमध्ये, सहकारी बँकांमधील



निकाली कर्जांनासुध्दा ही योजना लागू केलेली असल्याने सहकार कायद्यातील कलम ९१ व कलम १०१ अंतर्गत निकाली निघालेल्या दाव्यांमधील कर्जदारांनासुध्दा या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच ज्या कर्जदारांविरुध्द बँकेने सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत कारवाई सुरु केलेली असेल व ती कारवाई कोणत्याही टप्प्यावर असली तरी त्या कर्जदारांनासुध्दा या योजनेचा लाभ घेता येईल. थोडक्यात, निकाली निघालेल्या अथवा प्रलंबित असलेल्या दाव्यांमधील कर्जदारांना या योजनेचा लाभ घेता येईल. मात्र, जेथे बँक व कर्जदार यांच्यामध्ये न्यायालयासमोर तडजोड झालेली आहे व त्या तडजोडीचे न्यायालयाने आपल्या आदेशात रुपांतर केले आहे (Consent Decree) अशा कर्जदारांना मात्र या योजनेचा लाभ घेता येणार नाही. निकाली दाव्यांना सुध्दा ही योजना लागू केलेली असल्याने कनिष्ठ स्तरावर निघालेल्या दाव्यांमधील कर्जदार, अपील करण्यापेक्षा तडजोडीचा मार्ग स्वीकारतील व यामुळे न्यायव्यवस्थेवरील ताण कमी होण्याबरोबरच बँकांच्या वसुलीतही भरघोस वाढ होईल.

३) पुर्वीच्या योजनेमध्ये कर्जदाराने २५% रकमेचा भरणा केल्यानंतर त्यास उर्वरित ७५% रकमेसाठी १२ महिन्यांचा कालावधी मिळत होता. या योजनेध्ये मात्र २% दंडव्याजासह कर्जदारास १२ महिने जादा असा एकूण २४ महिन्यांचा कालावधी मिळू शकत असल्याने ही एक प्रकारची कर्जाची पुनर्बांधणीच आहे (Reschedulement of Loan). कर्जदाराने भरलेली २५% रक्कम बँकांना व्याजात जमा करता येणार असल्याने त्यांच्या नफ्यामध्ये जशी वाढ होणार आहे, तसेच उर्वरित रकमेचे कर्जही सुरु राहणार आहे. त्यामुळे संबंधित कर्जास आलेला खर्च (Cost of Lending) बँकेस वसूल करता येणार आहे. आपले उर्वरित कर्ज व्यवस्थित भरल्यास कर्जदार व बँक यांच्या संबंधातही सुधार होऊन त्यांच्यातील बँकिंगचे संबंध पुढेही सुरु राहू शकतील.

४) कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला प्राप्त झाल्यावर सदर दाखल्यांची अंमलबजावणी करत असताना वसूल झालेल्या रकमेवर बँकेस सहकार खात्यास १.७५% ते ६% पर्यंतची रक्कम सरचार्ज म्हणून भरावी लागत होती व या रकमेचा बोजाही कर्जदारावरच पडत होता. मात्र या योजनेअंतर्गत कलम १०१ अंतर्गत वसुली दाखला प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्येही तडजोड करता येत असल्याने अशा तडजोडीत बँकेमध्ये भरणा केलेल्या रकमेवर शासनाचीही फी कर्जदारांना भरावी लागणार नसल्याने कर्जदारांना मोठीच सवलत मिळणार आहे.

५) सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे, शासनाने ही योजना स्थायी आदेश (Standing Orders) स्वरुपात प्रसिध्द केलेली असल्याने, या योजनेतील सर्व पध्दती पाळणे बँकांवर बंधनकारक राहणार आहे. पूर्वी अनेक



बँकांमधून कर्जदारांना सूट देताना सर्वांच्या बाबतीत समान पध्दत अवलंबली जात नव्हती. कित्येकदा कर्जदारांना आपल्या कर्जासाठी एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत परतफेड करण्याचा अर्ज करुनही बँकेकडून त्यांना प्रतिसाद

मिळत नव्हता. बऱ्याच वेळेस बँकेकडे अशी कोणती योजना आहे का? याबाबत विचारणा करुनही कोणतेच उत्तर संबंधितांना मिळत नव्हते. थोडक्यात कर्जदारास अशा




योजनेअंतर्गत सवलत द्यावयाची अथवा नाही हे सर्वस्वी बँक व्यवस्थापनावरच अवलंबून असायचे. या योजनेमध्ये मात्र ही योजना सर्व कर्जदारांना समानपणे लागू करण्याचे बंधन जसे बँकांवर आहे, तसेच प्राप्त झालेल्या अर्जांवर ३० दिवसांत निवाडा देण्याचे बंधनही बँकेवर आहे. तसेच नामंजूर केलेल्या अर्जासोबत संबंधित अर्ज नामंजूर केल्याची कारणे देणे बँकेवर बंधनकारक असल्याने त्याविरुध्द जिल्हा उपनिबंधकांकडे अर्जदारास दाद मागता येणे शक्य होईल. यामुळे या योजनेच्या अंमलबजावणीतील पारदर्शीपणावर शासनाचाही अंकुश राहणार आहे.

६) या योजनेतील दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, आपले कर्ज संशयित-१ (Doubtful-1) या वर्गवारीत गेल्यानंतर कर्जदारांनी बँकेमध्ये भरलेल्या सर्व रकमेची वजावट कर्जदारास तडजोड रकमेतून मिळणार आहे. यापूर्वी मात्र अशी वसूल झालेली रक्कम बँकांनी थकित व्याजामध्ये वसूल केलेली असल्याने या रकमांची वजावट कर्जदास मिळत नव्हती. तसेच अर्जासोबत ५% रकमेचा भरणा केल्याने अर्जदाराची इच्छाशक्तीही दिसून येते. तसेच जर बँकेने अर्जदाराचा अर्ज नामंजूर केलाच तर अर्जदाराने अर्जासोबत भरलेली रक्कम व्याजात वसूल न करता मुद्दलात वसूल करावयाची असल्याने अर्जदाराची फसवणूक होणार नाही.



७) या योजनेअंतर्गत दिलेल्या सवलतीस सहकार कायद्यातील नियम ४९ ची प्रोसिजर लागू होणार नसल्याने, वार्षिक सभेची मान्यता, त्यानंतर सहकार खात्याची मान्यता वगैरे, सोपस्कार पार पाडावे लागणार नाहीत. यामुळे ज्या बँकांना या योजनेची खरोखरच गरज आहे अशा 'क' व 'ड' वर्गातील बँकांना ही योजना राबविता येणार आहे. मात्र, याचबरोबर या योजनेअंतर्गत सवलत दिलेल्या सर्व कर्ज





प्रकरणांची माहिती विशिष्ट व विहीत नमुन्यात वार्षिक सर्वसाधारण सभेस देणे बँकांना बंधनकारक असल्याने, वार्षिक सभेतही सर्व माहिती मिळणार आहे.

८) या योजनेअंतर्गत सवलत मिळालेल्या कर्जदारांना त्याच बँकेकडून पुढील पाच वर्ष कोणत्याही प्रकारची सवलत घेता येणार नसून, इतर कोणत्याही कर्जास जामीनही राहता येणार नसल्याने, पहिले कर्ज फेडतांना सवलत घेऊन लगेच नवीन कर्ज घेण्याच्या वृत्तीसही यामुळे आळा बसणार आहे.

९) यापूर्वी बँका त्यांनी काढलेल्या तडजोडीच्या रकमेसंबंधी खुलासा करण्यास नाखुष असत, तसेच ही रक्कम बँकेने कशी ठरविली ? यासंबंधी काहीही सांगण्यास अथवा लेखी देण्यास तयार नसत. या योजनेनुसार मात्र बँकेस आपल्या मंजुरी पत्रासोबत बँकेची कॅलक्युलेशन्स व शासनाच्या योजनेची एक प्रत कर्जदारास देणे बंधनकारक असल्याने तडजोडीच्या रकमेबद्दल अर्जदाराचे पूर्ण समाधान होणार आहे.

१०) पुर्वीच्या योजनेत २५% रक्कम अर्जदारास ताबडतोब भरावी लागत होती व उर्वरित रक्कम मंजुरी पत्र मिळाल्यापासून ३० दिवसांमध्ये भरावी लागत होती. या नवीन योजनेमध्ये मात्र २५% रक्कम प्रथम ३० दिवसांत अर्जदाराने भरावयाची असून या ३० दिवसांसाठी त्यास कोणतेही व्याज लागणार नाही, हे या योजनेचे अजून एक वैशिष्ट्य आहे. तसेच उर्वरित रक्कम भरण्यास पुढील ११ महिन्यांसाठी द.सा.द.शे. १३% व त्यापुढील १२ महिन्यांसाठी २% दंडव्याजासह १५% रक्कम अर्जदारास भरावी लागणार आहे. अशा प्रकारे कर्जदारास भरपूर सवलत व पुरेसा कालावधी देणारी ही योजना आहे.

११) या योजनेनुसार संशयित-१ (Doubtful-1) च्या दिवशी येणे रकमेवर बँकेने आकारावयाचा व्याजदर हा चक्रवाढ पध्दतीने आकारावयाचा नसून, तो सरळव्याज पध्दतीने आकारावयाचा असल्याने, जेवढे खाते जुने तेवढी कर्जदारास जास्त सवलत मिळणार असून हा व्याजदर द.सा.द.शे. इतका ठेवण्यात आला आहे. तसेच सरळव्याज पध्दतीने आकारणी केल्यामुळे हा व्याजदर प्रत्यक्षात कमीच असणार आहे.



१२) कर्जास तारण असलेल्या मालमत्तेची सध्याच्या बाजारभावाप्रमाणे विक्री करुन येणारी किंमत थकित कर्ज रकमेपेक्षा जास्त असली तरी अशा कर्जांनाही ही योजना लागू असल्याने, अशा कर्जदारांनाही ही एक पर्वणीच आहे.

अशा प्रकारे थकित कर्जदारांना आपले कर्ज खाते सन्मानाने बंद करण्याची सुवर्णसंधी या योजनेद्वारे शासनाने दिलेली आहे.

****